ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : खंड १

# कौटुंबिक धार्मिक कृती आणि सामाजिक कृती यांमागील शास्त्र

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे
सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ
कु. मधुरा भिकाजी भोसले आणि अन्य



## सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**


सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# 卐 सनातनची गुरुपरंपरा 卐



**प.पू. भक्तराज महाराज, इंदूर, मध्यप्रदेश.**

डॉ. आठवले यांचे गुरु आणि सनातन संस्थेचे श्रद्धास्थान



**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले**

सनातन संस्थेचे संस्थापक



**श्रीसत्‌शक्ति**

**(सौ.) बिंदा सिंगबाळ**




**श्रीचित्‌शक्ति**

**(सौ.) अंजली गाडगीळ**

(सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी)

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २१.११.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।<br>
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ॥<br>
सनातन धर्म माझे नित्य रूप ।<br>
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

## सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



कु. मधुरा भिकाजी भोसले

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्या साधकांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**प्रकरण १ : कौटुंबिक धार्मिक कृतींमागील शास्त्र** ९

**१. वाढदिवस** ९

१ इ. वाढदिवस तिथीनुसार साजरा करण्याचे महत्त्व ११

१ ई. वाढदिवस साजरा करण्याची पद्धत १५

१ उ. वाढदिवसाच्या दिवशी करायच्या कृतींमागील शास्त्र १७

१ ए. वाढदिवसाला टाळायच्या कृती अन् त्यांमागील शास्त्र २१

१ औ. लहान मुले, वृद्ध अन् संत यांचा वाढदिवस साजरा करणे २८

**२. औक्षण करणे** ३०

२ आ. औक्षणाचे महत्त्व २ इ. औक्षण कोणाचे करावे ? ३०

२ ऐ. विविध औक्षणे करण्याचा उद्देश आणि त्यांचा जिवावर होणारा परिणाम ३५

**३. अहेर करणे** ४७

३ ई. अहेर करतांना द्यावयाच्या वस्तूला हळद-कुंकू का लावतात ? ४८

३ उ. सर्वोच्च अहेर कोणता आणि तो कोण देऊ शकतो ? ४८

**४. शांती करणे** ४९

४ इ. वयानुसार शांतीचे प्रकार अन् शांतीच्या प्रमुख देवता ४९

**५. सत्यनारायणाची पूजेचे महत्त्व आणि सूक्ष्म परीक्षण** ५७

**प्रकरण २ : सामाजिक कृतींमागील शास्त्र** ६०

**१. उद्‌घाटन** ६०

१ इ. पद्धती १ ई. फीत कापून उद्‌घाटन का करू नये ? ६०

**२. दीपप्रज्वलन** ६५

२ अ. भावार्थ २ आ. महत्त्व ६५

२ इ. नारळ वाढवणे अन् दीपप्रज्वलन यांमागील शास्त्र ६६

**३. सत्कार करणे** ७६

३ इ. कोणाचा करावा ? ३ ई. सत्कार कोणी करावा ? ७६

**४. ग्रंथप्रकाशन** ८४

४ आ. 'ग्रंथप्रकाशन सोहळ्यात म्हणावयाचे श्लोक ८५

**५. विविध विषयांवरील कार्यक्रमांत संस्कृत श्लोक का म्हणावेत ?** ८७

**६. व्यासपिठावरील २ सत्रांतील कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे ?** ९०

**७. शोकसभा** ९१

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ९४

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ९७

## मनोगत

‘सुखं न विना धर्मात् । तस्मात् धर्मपरो भवेत् ॥’ म्हणजेच ‘खरे सुख (आनंद) हे धर्मपरायण झाल्याविना मिळत नाही; म्हणून नेहमी धर्मपरायण असावे’, असे संस्कृत सुवचन आहे. जीवनाचे रहाटगाडे चालवत असतांनाच सतत धर्मपरायण बनण्याची, म्हणजेच धर्माचरण करण्याची सोपी संधी हिंदु धर्माने विविध धार्मिक कृती, संस्कार, सण, व्रते इत्यादींच्या माध्यमातून दिली आहे. नित्याची देवपूजा, तसेच सण-व्रते यांसारख्या उपासनेशी संबंधित कृतींतूनच नव्हे, तर कौटुंबिक आणि सामाजिक स्तरांवरील धार्मिक कृतींतूनही धर्माचरणाचा संदेश हिंदु धर्माने दिला आहे.

कोणतीही विधायक कृती ही हिंदु धर्माप्रमाणे विधीवत, म्हणजेच अध्यात्मशास्त्रीय आधार असलेल्या विधींचे पालन करून केली, तरच त्या कृतीद्वारे देवतांचा आशीर्वाद मिळून त्यांच्या कृपेमुळे वाईट शक्तींपासून रक्षण होण्यासही साहाय्य होते. अशी कृती व्यष्टीसह समष्टीलाही आध्यात्मिक लाभ मिळवून देत असल्याने ती एकप्रकारे समष्टी साधनाच ठरते. या ग्रंथात वाढदिवस, औक्षण, अहेर देणे, वयोमानाप्रमाणे शांती करणे या कौटुंबिक कृती आणि उद्‌घाटन, दीपप्रज्वलन, सत्कार करणे आणि शोकप्रदर्शन या सामाजिक कृती करण्यामागील उद्देश, त्यांच्या अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य पद्धती अन् त्यांमागील शास्त्र समजावले आहे. शास्त्र समजून घेऊन ती ती कृती श्रद्धापूर्वक केली असता, त्या कृतीद्वारे होणारी फलप्राप्ती अधिक असते. संस्कृत श्लोक म्हणण्याचे महत्त्व आणि अध्यात्मविषयक प्रवचन, ग्रंथप्रदर्शन, तसेच जनजागृती मोर्चे, शोकसभा यांसारख्या प्रसंगी कोणते श्लोक म्हणावेत, यांविषयीचे विवेचनही (माहितीही) या ग्रंथात दिले आहे.

सध्या हिंदू पाश्चात्त्यांच्या ओंजळीने पाणी पीत आहेत. स्वधर्म आणि स्वसंस्कृती यांचा पडलेला विसर अन् पाश्चात्त्य संस्कृतीची पडलेली भुरळ यांचा परिणाम म्हणून आपल्या धार्मिक कृतींवर पाश्चात्त्य संस्कृतीचा मोठा प्रभाव पडला आहे. वाढदिवस औक्षण करून नव्हे, तर केक कापून आणि

मेणबत्त्या विझवून साजरा करणे; उद्घाटन नारळ वाढवून नव्हे, तर फीत कापून करणे; दीपप्रज्वलन तेलाच्या दिव्याने नव्हे, तर मेणबत्तीने करणे यांसारख्या कितीतरी उदाहरणांवरून हे लक्षात येते. अशा कृतींतून चैतन्य मिळत तर नाहीच, तसेच त्या आध्यात्मिकदृष्ट्या हानीकारक कशा ठरतात, हे या ग्रंथात सशास्त्र दिले आहे.

ग्रंथात दिलेल्या शास्त्राप्रमाणे कृती करून व्यष्टी आणि समष्टी उन्नती साधली जावो, तसेच हिंदूंमध्ये आपला धर्म अन् संस्कृती यांविषयीचा अभिमान जागृत होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.